# विविध सरकारी योजना आणि महिला सशक्तीकरण

**कु. रेश्मा चांगदेव निकम** सहाय्यक प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग मुधोजी महाविद्यालय फलटण ता.फलटण जि.सातारा

---

**सारांश:-**

महिला सक्षमीकरण योजना ही केंद्र सरकार आणि राज्य सरकारांनी भारतातील महिलांना सक्षम करण्यासाठी सुरू केलेल्या योजना आहेत महिला सक्षमीकरण म्हणजे सर्व वयोगटातील महिलांना संसाधने संधी निर्णय घेण्याची शक्ती आणि क्षमता बांधणी मध्ये समान प्रवेश प्रदान करणे शिक्षण कौशल्य विकास रोजगाराचे संधि वाढवणे इत्यादी माध्यमाद्वारे महिला सक्षमीकरण साध्य करता येते महिला सक्षमीकरणासाठी सरकार योजना भारत सरकारच्या प्रमुख प्राधान्य पैकी एक आहेत सरकारने विविध मंत्रालय व विभागाद्वारे महिला सक्षम करण्यासाठी विविध योजना सुरू केल्या आहेत

**प्रस्ताविक:-**

स्त्री ही सृष्टीची शक्ती मानली जाते म्हणजेच मानव जातीचे अस्तित्व स्त्रीपासून आहे असे मानले जाते आधुनिक काळात महिला सक्षम करण्याचा हा विशेष चर्चेचा विषय आह समाजात महिलांचे स्थिती सुधारणे महिलांचे आर्थिक स्वतंत्र वाढवणे महिलांना शिक्षण व समान अधिकार सुरक्षितता समाजात लिंग समानता प्रस्थापित करणे महिलांना रोजगाराचे संधी उपलब्ध निर्माण करणे तिच्या हक्क ची जाणीव करून देणे जीवनामध्ये स्वावलंबी व स्वाभिमानी बनवण्याचा आहे महिला सक्षमीकरण महिलांना ते बळ देते जे त्यांना त्यांच्या हक्कासाठी लढण्यास मदत करते.

**महिला सक्षमीकरण अर्थ:-**

कायदे व कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून आर्थिक सामाजिक शैक्षणिक व राजकीय सर्व क्षेत्रांमध्ये महिलांना पुरुषाच्या बरोबरीने हक्क व दर्जा प्रदान करून देणे विकासासाठी संधी उपलब्ध करून देणे आणि स्त्री पुरुष असमानता नष्ट करणे या प्रक्रियेला महिला सक्षमीकरण असे म्हणतात

महिला सक्षमीकरणाचे उद्दिष्टे :-

1)महिलांना हिंसा आणि भेदभाव दूर करणे

2) महिलांना शिक्षण आरोग्यसेवा आणि आरोग्याच्या संधीमध्ये समान प्रवेश सुनिश्चित करणे

3)निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत महिलांचा सहभाग आणि नेतृत्व वाढवणे

4)महिलांना आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी संधी देणे

5) महिलांच्या जीवन सुधारणे

**संशोधन पद्धती**: - प्राथमिक पद्धती व द्वितीय पद्धती द्वितीय मध्ये वर्तमानपत्रे, इंटरनेट, पुस्तके इत्यादी.

योजना

1) प्रधानमंत्री मातृत्व वंदन योजना

प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजना ही महिला आणि बाल विकास मंत्रालयामार्फत ही योजना चालवण्यात येते. जानेवारी 2017 मातृत्व योजनेचा लाभ देणाऱ्या योजनेची व्याप्ती देशभर वाढविली आहे या योजनेत शासनाकडून प्रधानमंत्री मातृत्व वंदन योजने अंतर्गत गरोदर महिला आहेत आणि ज्या स्तनदा माता आहेत त्यांना 5000 रुपयांची आर्थिक मदत या योजनेद्वारे केली जाते तसेच गरोदर महिलांना या योजनेचे रक्कम तीन टप्प्यात देण्यात येते

2) स्वाधार योजना

2001 2002 केंद्र सरकारने (भारत सरकारच्या महिला व बालकास विभागाकडून )राबवले जाणारे जाते कठीण परिस्थितीचा सामना करावा लागणारे स्त्रियांसाठी ही योजना सुरू करण्यात आली संकटात सापडलेल्या महिलांचे पुनर्वसन करणे अडचणीत व कठीण परिस्थितीचा सापडलेल्या महिलांना अन्न वस्त्र निवारा आरोग्य अशा प्राथमिक सुविधा उपलब्ध करून देणे सामाजिक व आर्थिक पुनर्वसनासाठी केंद्र सरकारकडून अनुदान केले जाते योजना अंतर्गत स्त्रियांसाठी एक हेल्पलाईन चालवले जाते निर्धार महिला हुंडाबळी लेंगी अत्याचार पीडित निर्धार महिला ग्रस्त कुठून बहीण महिला दहशतवादी हल्ल्याचा शिकार झालेल्या कुटुंबातील महिला कारागृहातून तुरुंगातून सुटून आलेल्या महिला विधवा महिला इत्यादींना योजनेचा लाभ मिळतो.

3) माझी कन्या भाग्यश्री योजना

1 मे २०१७ पासून महाराष्ट्र शासनाकडून मुलींचा जन्मदर प्रमाण सुधारण्यासाठी, स्त्री शिक्षणाला चालना देण्यासाठी माझी कन्या भाग्यश्री योजना ही योजना सुरू करण्यात आली आहे. या योजने केली जाते. च्या माध्यमातून मुलीच्या जन्मानंतर 1

वर्षाच्या मध्ये पालकांनी जर दुसरी मुलगी जन्मल्यापासून 6 महिन्याच्या मध्ये नसबंदी केल्यास त्यांना 50,000 हजार रुपयांची रक्कम शासनाकडून मुलांच्या नावावर बँक खात्यात जमा केली जाते. ही योजना महाराष्ट्र सरकारने 2017 पासून सुरू केली आहे.

4) वंदे मातरम योजना

ही योजना नो फेब्रुवारी 2004 रोजी सुरू करण्यात आली बालमृत्यू दर व माता मृत्यू दर कमी करण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली या योजनेचा प्रमुख उद्देश हा नवजात बालके गरोदर स्त्रियांचा मृत्यूदर व विकृती दर नियंत्रित आणणे ही राबवणारी यंत्रणा खाजगी व सहकारी दवाखाने तसेच खाजगी व सहकारी दवाखान्यात दर महिन्याच्या 9 तारखेला मोफत तपासणी व कुपोषित गरीब व अशिक्षित मुलांना फायदेशीर आहे

5) महिला उद्योजकता निधी योजना

भारत सरकारने 2020 मध्ये पहिला उद्योजकता निधी योजना सुरू केली ज्या महिलांना उद्योजकांना व्यवसाय सुरू करायचा आहे परंतु व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक निधी नाही त्यासाठी महिला उद्योजकता निधी योजना उपयुक्त ठरू शकते

6) महिला शक्ती केंद्र योजना

ही योजना मार्च 2017 मध्ये 500 कोटी रुपयांच्या खर्च सुरू करण्यात आली देशातील सर्व जिल्ह्यांमध्ये महिला सक्षमीकरण केंद्र उपलब्ध करून देणे ही योजनेचे उद्दिष्ट आहे हे केंद्र महिलांसाठी एक स्टॉप सेवा प्रदान करतील त्यामध्ये सरकारी योजना आणि कार्यक्रमाची माहिती आणि प्रवेश आरोग्य पोषण सेवा कायदेशीर मदत आर्थिक समाविष्ट सेवा कौशल्य विकास प्रशिक्षण इत्यादी समावेश असेल.

**निष्कर्ष:-**

भारतातील महिला सक्षमीकरण योजना महिलांना संसाधने, संधी आणि संरक्षणाची समान उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी आहेत. हे ध्येय साध्य करण्यासाठी सरकार तसेच स्वयंसेवी संस्थांकडून अनेक वेगवेगळे कार्यक्रम आणि उपक्रम चालवले जातात. अजूनही बरीच प्रगती करायची आहे, तरीही २०२१ मध्ये भारतातील महिला सक्षमीकरणासाठी सरकारी योजनांनी खूप मोठा पल्ला गाठला आहे आणि दरवर्षी लाखो महिलांच्या जीवनावर प्रभाव पडत आहेत.

**संदर्भसूची:-**

1) भारतीय समाजातील महिला सक्षमीकरण - डॉ. दिनेश कुमार, विश्वकर्मा जेटीएस पब्लिकेशन, दिल्ली

2) महिला सक्षमीकरण - डॉ. उपमा सक्सेना, अध्यायन प्रकाशन, दिल्ली.

3) महिला सक्षमीकरण - इंद्रराज सिंग, डायमंड पब्लिकेशन्स

4) महिला सक्षमीकरण - दशा आणि दिशा योजेंद्र शर्मा, लोकभारती प्रकाशन,

5) स्वातंत्र्याची स्त्री बाजू - अनामिका, राजकमल पब्लिकेशन, दिल्ली

6)सामाजिक आर्थिक व मानव विकासाच्या शासकीय योजना -अंकुश चिंतामणी सुदृढ प्रशांत सावंत सिद्धेश्वर मोरे